अत्यंत महत्वाचे
शिबीर

जा.क्र.शिउसं/प्रशि-४/सूचनापत्र /पुवि/११-१२/ ११६८२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- 30 APR 2012

प्रति,

संस्था सचिव/अध्यक्ष
सर्व अनु./विनाअनु/ कायम विनाअनु अध्यापक विद्यालये,
पुणे विभाग.

विषय - स्टाफ प्रोफाईल सन २०११-१२ बाबत

उपरोक्त विषयांस अनसरुन कळविण्यात येते की, सन ११-१२ चे स्टाफ प्रोफाईल तयार करताना पुढील प्रमाणे प्रस्ताव दाखल होतील याची खबरदारी घेण्यात यावी.

**ज्या अध्यापक विदयालयांना अदयापी सन ११-१२ चे वैयक्तिक मान्यता प्रती प्रस्ताव तपासून सादर करुनही अदयापी मिळाल्या नसल्यास त्यांनी कार्यालयाशी त्वरीत समक्ष संपर्क साधून त्या प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात. म्हणजे स्टाफ प्रोफाईल प्रकरणे सादर करणे सोयीस्कर होईल.**

(इ)-स्टाफ प्रोफाईल

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात अध्यापक विदयालयांचे स्टाफ प्रोफाईल सादर करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन प्रस्ताव खालील क्रमाने कागदपत्रे लावून सादर करण्यात यावा.

१.आपल्या अध्यापक विदयालयाचे मुखपत्र (कोणत्या वर्षाचे स्टाफ प्रोफाईल आहे ते वर्ष नमूद करणे आवश्यक आहे ) पडताळा सूची २ प्रतीत माहिती सह पूर्ण भरलेली जोडावी. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी माहिती एकाच वेळी सादर करावी दोन स्वतंत्र प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. शिबीरामध्येच वेळेत स्टाफ प्रोफाईल सादर करण्यात यावे. एका अध्यापक विदयालयाचा एकच प्रस्ताव सादर करावा.**प्रत्येक पानावर कॉलेजचे नांव व वर्ष नमूद केलेले असावे**

२. स्टाफ प्रोफाईल चार प्रतीत सादर करावे. सर्व **प्रकरणिकेस अनुक्रमांक देण्यात आलेले असावेत**

१. स्टाफ प्रोफाईलचा विहीत नमुना वापरण्यात यावा व सर्व रकाने परिपूर्ण भरावेत. मान्यता असल्यास आदेशाचा दिनांक तक्त्यात नमूद करावा.

२. स्टाफ प्रोफाईलवर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याच्या अलिकडच्या काळातील रंगीत छायाचित्राची प्रत चिटकविण्यात यावी. ( फोटोची झेरॉक्स जोडण्यात येवू नये )

३.स्टाफ प्रोफाईल मध्ये प्राचार्य पदास या कार्यालयाची वैयक्तिक मान्यता असल्यास त्यांच्या फोटोवर संस्था अध्यक्ष / सचिव यांचा सही व शिक्का असावा. इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या फोटोवर या कार्यालयाची वैयक्तिक मान्यता असलेल्या प्राचार्याची सही व स्वाक्षरी असावी. ( झेरॉक्स प्रत फोटोची जोडू नये ).

४. बी.एड महा विदयालयाचे प्राचार्य असल्यास त्यांची सेवा निवृत्ती दिनांक ही विदयापीठाच्या नियमानुसार लिहावी व मान्यता प्रत ही विदयापीठाची जोडण्यात यावी. त्या खेरीज प्राचार्याचे नांव नमूद करण्यात येवू नये .

५. इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत शासन निकषानुसार वर्ग -४ च्या कर्मचा-यांना ६० वर्षानंतर सेवा निवृत्ती दिनांक लिहावी व इतर वर्ग २ व वर्ग ३ च्या बाबतीत ५८ वर्षानंतर सेवा निवृत्ती दिनांक लिहावी.

६. वैयक्तिक मान्यता घेते वेळी प्रस्ताव सादर करताना या कार्यालयास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची जी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अनुभव दर्शविण्यात आला होता तीच माहिती स्टाफ प्रोफाईलमध्ये दर्शविण्यात यावी.

३. एन.सी.टी.ई च्या सर्व मान्यता प्रती

४. एस.सी.ई.आर.टी.च्या सर्व मान्यता प्रती

५. या कार्यालयाची सन ११-१२ ची संच मान्यता

६. वैयक्तिक मान्यता प्रती (दिनांकानुसार जोडाव्यात ) कर्म.स्टा.प्रो.क्र. मान्यता आदेशावर नमूद करावा.

७ शुल्कनिश्चिती मंजूर झालेली असल्यास मंजूर झालेले पत्राची प्रत जोडावी.

८. अध्यापक विदयालयाचे प्राचार्य / सचिवांचे फी संदर्भातील हमी पत्र सन ११-१२ मध्ये आकारण्यात आलेले फी संदर्भात रु.१०० चे स्टॅप पेपर वर असावे. **मूळ प्रत शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे यांचे प्रकरणांस जोडलेली असावी.**

९. स्टाफ प्रोफाईल मध्ये नमूद केलेले सर्व कर्मचारी हे नियुक्ती दिनांकापासून अध्यापक विदयालयांत कार्यरत असल्या बाबतचे हमी पत्र संस्था अध्यक्ष / सचिवांचे रु.१०० चे स्टॅप पेपर वर असावे.सन ११-१२ वर्षात कार्यरत कर्मचा-यांची माहिती भरावी सोडून गेलेले कर्मचारी नमूद करु नयेत.

१०. जीवन शिक्षणची सन ११-१२ ची फी ची पावती जोडावी.

११. सर्व कर्मचा-यांचे प्रपत्र अ,ब, व क मान्यतेस्तव सादर केलेले प्रस्तावाचे कागदपत्रे स्टा.प्रो.मध्ये नमूद केलेले अनुक्रमांकाने लावलेले असावेत. (जाहीरात,नियुक्ती आदेश,ठराव,रुजूअहवाल,शै.पात्रता,व्या.पात्रता प्रमाणपत्रे ,इतरत्र संस्थेत काम करत नसल्याचे सर्व कर्मचा-याचे हमी पत्र )

**वरील सूचनांनुसार प्रस्ताव पुढील नियोजित शिबीरामध्ये सादर होतील याची खबरदारी घेण्यात यावी. दिलेल्या तारखांना उपस्थित राहावे.**

| अ.क्र. | जिल्हा | महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेचा सांकेतांक क्रमांक | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर | २३०२,२३०३,२३०४,२३०५,२३०६,२३०७,२३०८, | दि.१५/५/२०१२ | प्रस्तुत कार्याल |
| | | २३०९,२३१०,२३११,२३१२,२३१३,२३१४,२३१५,२३१६, | दि.१६/५/२०१२ | --,,- |
| | | २३१७,२३१८,,२३२०,२३२१,२३२२,२३२३,२३२४,२३२५, | दि.१७/५/२०१२ | --,,- |
| | | २३२६,२३२७,२३२८,२३२९,२३३०,२३३१,२३३२,२३३३, | दि.१८/५/२०१२ | --,,- |
| | | २३३४,२३३५,२३३६,२३३७,२३३८,२३३९,२३४०,२३४१ | दि.१९/५/२०१२ | --,,- |
| | | २३४२,२३४३,२३४४,२३४५,२३४६,२३४७,२३४८,२३४९ | दि.२२/५/२०१२ | --,,- |
| | | २३५०,२३५१,२३५२,२३५३,२३६१ | दि.२३/५/२०१२ | --,,- |
| २. | नगर | २२४९,२२०२,२२०३,२२०४,२२०५,२२०६,२२०७,२२०८, | दि.२४/५/२०१२ | --,,- |
| | | २२०९,२२१०,२२११,२२१२,२११३,२२१४,२२१५,२२१६, | दि.२५/५/२०१२ | --,,- |
| | | २२१७ ,२२१८,२२१९,२२२०,२२२१,२२२२,२२२३,२२२४ | दि.२९/५/२०१२ | --,,- |
| | | २२२५,२२२६ ,२२२७,२२२८,२२२९,२२३०, २२३१ ,२२३२, | दि.३०/५/२०१२ | --,,- |
| | | २२३३,२२३४,२२३५,२२३६, २२३७,२२३८, ,२२३९,२२४० | दि.३१/५/२०१२ | --,,- |
| | | २२४१,२२४२,२२४३,२२४४,२२४५,२२४६,२२४७,२२४८, | दि.१/६/२०१२ | --,,- |
| ३. | पुणे | २१०४,२१०५,२१०६,२१०७,२१०८, २१०९,२११०,२१११ | दि.२/६/२०१२ | --,,- |
| | | २११२, २११३,२११४,२११५,२११६, २११७,२११८,२११९ | दि.५/६/२०१२ | --,,- |
| | | २१२०,२१२१,२१२२,२१२३,२१२४,२१२५,२१२६,२१२७ | दि.६/६/२०१२ | --,,- |
| | | २१२८,२१२९,२१३०,२१३१,२१३२ ,२१३३,२१३४,२१३५ | दि.७/६/२०१२ | --,,- |
| | | २१३६, २१३७,२१३८,२१३९,२१४०, २१४१,२१४२,२१४३ | दि.८/६/२०१२ | --,,- |
| | | २१४४, २१४५,२१४६,२१४७,२१४८, २१४९,२१५०,२१५१ | दि.१२/६/२०१२ | --,,- |
| | | २१५२,२१५३,२१५४,२१५५,२१५६, २१५७,२१५८,२१५९ | दि.१३/६/२०१२ | --,,- |
| | | २१६०,२१६१,२१६२,२१६३,२१६४, २१६५,२१६६,२१६७ | दि.१४/६/२०१२ | --,,- |
| | | २१६८, २१६९,२१७०,२१७१,२१७२, २१७३,२१७४,२१७५ | दि.१५/६/२०१२ | --,,- |
| | | २१७६,२१७७,२१७८,२१७९,२१८०, २१८१,२१८२,२१८३, | दि.१६/६/२०१२ | --,,- |

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १.